महाराष्ट्रातील जनतेचा आक्रोश, दैनिक नांदगांव

# आवाज

संपादक : भगवान सोनवणे

WWW.DAILYAWAZ.COM


✲ उत्सुकता ✲





RNI Reg. No.: MAHMAR/2014/66104 ■ वर्ष - १२ वे ■ अंक क्र. - २१३ ■ गुरूवार दि.१२ मार्च २०२६ ■ किंमत - १ रूपया ■ पाने - ४


## तरुणाचा मृतदेह आढळल्याने दोधेश्वर परिसरात खळबळ

**दै. आवाज वृत्तसेवा...**

पिंपळदर (प्रतिनिधी) : भगवान पवार सटाणा : बागलाण तालुक्यातील दोधेश्वर परिसरातील मुळेश्वर डोंगरावर एका तरुणाचा मृतदेह आढळून आल्याने परिसरात खळबळ उडाली आहे. काही तासांच्या तपासानंतर पोलिसांनी मृत तरुणाची ओळख पटवली असून तो आराई येथील रहिवासी असल्याचे समोर आले आहे.



नाशिक जिल्ह्यातील बागलाण तालुक्यातील दोधेश्वर येथील मुळेश्वर डोंगरावर एका अज्ञात तरुणाचा मृतदेह आढळून आल्याची माहिती पोलिसांना मिळताच सटाणा पोलीस स्टेशनचे पोलीस उपनिरीक्षक अतुल बोरसे यांच्यासह पोलीस कर्मचारी गणेश गरुड, भूषण सूर्यवंशी आणि रवींद्र सोनवणे यांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. पोलिसांनी घटनास्थळी पंचनामा करून तपास सुरू केला. तपासादरम्यान मृत तरुणाची ओळख आराई येथील विष्णू बळीराम माळी (वय २५) अशी पटली. ओळख पटताच पोलिसांनी त्यांच्या नातेवाईकांशी संपर्क साधून घटनेची माहिती दिली. पंचनामा व आवश्यक प्रक्रिया पूर्ण केल्यानंतर मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी नाशिक येथे पाठविण्यात आला आहे. उत्तरीय तपासणीचा अहवाल आल्यानंतरच मृत्यूचे नेमके कारण स्पष्ट होणार असल्याचे पोलिसांनी सांगितले. दरम्यान, विष्णू माळी यांचा मृत्यू नेमका कशामुळे झाला याबाबत अद्याप स्पष्टता नसून या प्रकरणाचा पुढील तपास योगेश पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस कर्मचारी वाडीलाल जाधव करत आहेत.

## नांदगावमध्ये शेतकरी, कष्टकऱ्यांचा भारतीय कम्युनिस्ट पक्ष शताब्दी मेळावा संपन्न

**दै. आवाज वृत्तसेवा...**

नांदगाव: भारतीय कम्युनिस्ट पक्षाच्या शताब्दी वर्षानिमित्त नांदगाव तालुका किसान सभा भारतीय कम्युनिस्ट पक्ष वतीने आयोजित भव्य मेळावा आज मालेगाव रोडवरील महाजन वाडा येथे उत्साहात पार पडला. 'संघर्ष, त्याग आणि बलिदानाची १०० वर्षे' या संकल्पनेखाली आयोजित या मेळाव्यात तालुक्यातील शेतकरी आणि कष्टकरी बांधवांनी मोठी गर्दी केली होती. या मेळाव्याचे अध्यक्षस्थानी मार्गदर्शक भाकपचे राज्य सहसचिव कॉ. राजू देसले यांनी पक्षाच्या शंभर वर्षांच्या गौरवशाली इतिहासाचा आढावा घेतला. ते म्हणाले की, हा शताब्दी महोत्सव केवळ उत्सव नसून, सामान्य जनतेच्या हक्कांसाठी चाललेल्या संघर्षाची ही पुढील दिशा आहे. भारतीय कम्युनिस्ट पक्ष ने १०० वर्ष केलेले काम घर घरात पोहचविण्यासाठी २३ मार्च पासून पत्रक घरोघरी देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. प्रत्यक सभासदाने १० घरी जाऊन पत्रक द्यावे पक्ष माहिती देण्यात येणार आहे. नांदगाव तालुक्यात मोहीम यशस्वी करावी असे आवाहन केले. शेतकऱ्यांना संपूर्ण कर्ज मुक्ती मिळाली पाहिजे. तुटपुंजी कर्जमुक्तीतून व्याज सुद्धा फिटणार नाही . ही फसवी आहे. कांदा उत्पादक शेतकरी अडचणीत आहे. ३हजार रु राज्य सरकारने अनुदान द्यावे. अमेरिका साम्राज्यवाद धोरण राबवत आहे. इराण मध्ये चिमुकल्या मुलींचा जीव घेतला आहे. याचा निषेध करत आहोत. त्वरित युद्ध थांबवावे . भारत सरकारने अमेरिकेचा निषेध केला पाहिजे होता. मात्र देशाचे पंतप्रधान मोदी एक शब्द ही बोलत नाहीत . युद्धा मुळे शेतकरी व भारतीय जनता अडचणीत सापडली आहे. भारतीय कम्युनिस्ट पक्ष शेतकरी, कामगार एकजूट बळकट करून या पुढील काळात लढा देईल याला साद द्यावी असे आवाहन किसान सभेचे नेते जिल्हाध्यक्ष कॉ. भास्करराव शिंदे, यांनी यावेळी शेती आणि वनजमिनीच्या प्रश्नावर सविस्तर मांडणी केली. शेतकरी कर्जमुक्ती, कांदा पिकाला प्रति क्विंटल ३००० रुपये अनुदान आणि प्रलंबित वनदावे मार्गी लावणे यांसाठी संघटनात्मक ताकद उभारण्याचे आवाहन त्यांनी केले. मेळाव्यातील प्रमुख विषय: मेळाव्यात प्रामुख्याने शेतकऱ्यांच्या विविध ज्वलंत प्रश्नांवर चर्चा करण्यात आली: शेतकरी हित: शेतीमालाला रास्त भाव आणि कांदा उत्पादकांना तातडीने आर्थिक मदत मिळणे आवश्यक असल्याचे मत व्यक्त करण्यात आले.



वनहक्क कायदा: मंजूर वन जमिनींची ७/१२ वर नोंद करणे आणि लाभार्थ्यांना विहिरींची सुविधा देणे यावर जोर देण्यात आला. भाकप जिल्हा सचिव कॉ. मनोहर पगारे यांनी जागतिक शांतता प्रस्थापित करण्यासाठी आणि जागतिक व्यापार करारातील त्रुटी दूर करण्यासाठी भारताने ठाम भूमिका घेण्याची गरज व्यक्त करण्यात आली. या प्रसंगी कॉ. भिमा पाटील, महिला आघाडी प्रमुख कॉ. साधनाताई गायकवाड आणि जिल्हा सहसचिव कॉ. देविदास भोपळे यांनीही आपले विचार मांडले. महाराष्ट्र राज्य खंडकरी शेतकरी संघटना राज्य अध्यक्षपदी ॲड साधना गायकवाड यांची निवड करण्यात आल्याबद्दल सत्कार करण्यात आला. भारतीय कम्युनिस्ट पक्ष व किसान सभा नांदगाव तालुक्याच्या वतीने या मेळाव्याचे नेटके आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या शेवटी शेतकरी आणि कष्टकऱ्यांच्या मागण्यांचा पाठपुरावा करण्याचा निर्धार करण्यात आला. भारतीय कम्युनिस्ट पक्ष नाशिक जिल्हा सह सचिव कॉम्रेड देविदास भोपळे यांनी नांदगाव किसान सभा व भारतीय कम्युनिस्ट पक्ष बळकट करण्याचा निर्धार प्रास्ताविकात व्यक्त केला. जिल्हासचिव कॉम्रेड मनोहर पगारे यांनी पक्ष मजबूत करण्यासाठी काम करावे असे आवाहन केले. आभार योगेश जाधव यांनी मानले या प्रसंगी रामदास चव्हाण, भास्कर पवार, निंबा अहिरे, आदी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते



## अवजड वाहनाच्या धडकेत भरवसची महिला जागीच ठार

**दै. आवाज वृत्तसेवा...**

लासलगाव, प्रतिनिधी- नाशिक - छत्रपती संभाजीनगर महामार्गावरील भरवस फाट्याजवळील जीवो पेट्रोल पंपासमोर दुचाकीला पाठीमागून अवजड वाहनाने जोरदार धडक दिल्याने दुचाकीवरील ३० वर्षीय महिलेचा जागीच दुर्दैवी मृत्यू झाला.



बुधवार दि.११ मार्च रोजी दुपारी १.३८ वाजेच्या सुमारास किरण अंबादास चौधरी व सोनाली किरण चौधरी हे भरवस फाटा परिसरात (एम एच १५, १८२६ पॅशन प्रो) दुचाकी वरून विंचूरकडे जात असतांना पाठीमागून येणाऱ्या अवजड वाहनाने (एम.एच.१५,एच.एच ९९३२) त्यांच्या दुचाकीला जोरदार धडक दिली. त्यात सोनाली चौधरी वय ३० या उडून लांब पडल्याने त्यांचा मेंदूला मार लागून जागीच मृत्यू झाला. पती किरण चौधरी हे गंभीर जखमी झाले आहेत.

घटनेची माहिती मिळताच लासलगावचे सहा.पोलिस निरीक्षक दिपक पाटील यांनी घटनास्थळी धाव घेतली. स्थानिक नागरिकांनी घटनास्थळी गर्दी करीत संताप व्यक्त केल्याने काही काळ वाहतूक विस्कळीत झाली होती.

पोलीस प्रशासनाकडून पुढील तपास सुरू असून, दोषी वाहनचालकावर कडक कारवाई करण्याची मागणी नागरिकांनी केली आहे. या मार्गावरच दोन दिवसांपूर्वी जळगाव नेऊर ता.येवला येथील तुषार विलास घुले (वय २८) व आकाश बाळूबा सोनवणे (वय २६) हे दोन जीवलग मित्र आपल्या दुचाकी एम.एच १७ आर.५३१८ वर विंचूर वरून जळगाव नेऊरला जात असताना अज्ञात वाहनाने त्यांना जबर धडक दिल्याने दोघांचा मृत्यू झाला होता. त्यामुळे हा रस्ता मृत्यूचा सापळा झाला आहे.

## डंपरची स्कूटीला धडक, चिमुकल्याचा मृत्यू

**दै. आवाज वृत्तसेवा...**

लासलगाव, प्रतिनिधी - लासलगाव परिसरात भरधाव वेगाने आलेल्या हायवा डंपरने स्कुटीला पाठीमागून जोरदार धडक दिल्याने झालेल्या भीषण अपघातात ९ वर्षीय अर्नव संतोष यशवंते याचा जागीच मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना बुधवार (दि.११ मार्च) रोजी दुपारी घडली. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.



याबाबत लासलगाव पोलीस ठाण्यात बाळकृष्ण यादव यशवंते (वय ६५, रा. नंदनवन नगर, लासलगाव ) यांनी फिर्याद दिली आहे. त्यानुसार त्यांची सून ज्योती संतोष यशवंते या टाकळी विंचूर येथील 'सेव्हन डे' इंग्लिश मीडियम शाळेत शिक्षिका असून त्या आपल्या मुलगा अर्नव (वय ९) याला दररोज स्कुटीवरून शाळेत आणणे-नेणे करीत असतात. बुधवारी दुपारी शाळा सुटल्यानंतर सुमारे २.४५ वाजेच्या सुमारास ज्योती यशवंते या अर्नवसह मेस्ट्रो एज १२५ (एम.एच.४१ बी.ए.१४२९) स्कुटीने संधान नगरमार्गे वृंदावन नगरकडे घरी जात असताना संधान नगरमधील कॉलनी रोडवर मागून आलेल्या टाटा कंपनीच्या हायवा डंपर (एम.एच.१५ एफ. व्ही.९५४७ ने भरधाव वेगात स्कुटीला जोरदार धडक दिली. या धडकेत

(पान २ वर)




# सातपूर जमीन हडप प्रकरणात न्याय न मिळाल्यास आत्मदहनाचा इशारा

**दै. आवाज वृत्तसेवा...**

नाशिक -: सातपूर परिसरातील जमीन हडप प्रकरणात जिल्हा प्रशासनाच्या भूमिकवर गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले असून, न्याय न मिळाल्यास जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आत्मदहन करण्याचा इशारा तक्रारदाराने दिल्याने शहरात एकच खळबळ उडाली आहे. मौजे सातपूर येथील अशोकनगर भागा-तील गट क्र ४९२ व ४९३ संदर्भातील कथित बेकायदेशीर फेरफार प्रकरणात दोषी व संबंधितांच्या विरुद्ध कारवाई होत नसल्याचा आरोप करत तक्रारदार सुनिता प्रभाकर दोंदे यांनी महसूल प्रशासनाविरोधात तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. या संदर्भात दि. २४ फेब्रुवारी २०२६ रोजी तसेच त्यापूर्वीही जिल्हाधिकारी कार्यालयाकडे लेखी तक्रार देण्यात आली असल्याचे त्यांनीअसल्याचे आहे. संबंधित प्रकरणात भुमाफिया श्री जितेंद्र मनोहरदास ठक्कर, शामसुंदर रामकिसन लाहोटी, लिलाबाई शामसुंदर लाहोटी, सोनल कपिल लाहोटी, कपिल शामसुंदर लाहोटी व इतर अनोळखी व्यक्तींनी महसूल अधिकाऱ्यांशी संगनमत करून सन १९८० मध्ये फेरफार नोंद क्रमांक २९३५ व २९३६ द्वारे महसूल अभिलेख ७/१२ मध्ये बेकायदशीररीत्या स्वतःची नाव दाखल केल्याचा गंभीर आरोप करण्यात आला आहे. या प्रकरणात कोणताही नोंदणीकृत खरेदीखत किंवा मोबदल्याचा व्यवहार झालेला नसताना महसूल अभिलेखात फेरफार करून जमीन बळकावण्याचा प्रकार घडल्याचा दावा तक्रारदारांनी केला आहे. या साध्या अर्जाच्या आधार संबंधित भूमाफिया कडून त्यांच्या कुटुंबाला मिळकतीवर वहिवाट करण्यास अडथळा निर्माण केला जात असून सतत दबाव व धमक्या दिल्या जात असल्याचही त्यांनी म्हटले आहे . या प्रकरणी यापूर्वीही सातपूर पोलीस ठाण्यात दि. २० जानेवारी २०२५ रोजी तक्रार दाखल करण्यात आली होती. त्यानंतर दि. २१ फेब्रुवारी २०२५ रोजी नाशिक शहर पोलीस आयुक्तांकडे तक्रार दाखल करण्यात आली असून अद्याप चौकशी चालू झाली आहे. मात्र जिल्हा प्रशासना इतक्या गंभीर प्रकरणात आजपर्यंत कोणतीही ठोस कारवाई झालेली नसल्याचा आरोप तक्रारदारांनी केला आहे. तक्रारदार सुनिता दोंदे या अनुसूचित जाती प्रवर्गातील असून त्यांच्या कुटुंबाची जमीन बळकावण्याचा गंभीर प्रकार घडल्याचा आरोप असतान-ाही प्रशासनाकडून अपेक्षित कारवाई होत नसल्याने त्यांनी तीव्र संताप व्यक्त केला आहे. जिल्हाधिकारी आयुष प्रसाद हे या प्रकरणात काहीच कारवाई करत नसल्याचा त्यांनी आरोप केला आहे. त्यामुळे शासनाने तातडीने लक्ष दऊन न्याय द्यावा, अशी मागणी त्यांनी केली आहे. गट क्रमांक ४९२ व ४९३ संदर्भातील फेरफार नोंद क्रमांक २९३५ व २९३६ तात्काळ रद्द करून मूळ स्थिती कायम करण्यात यावी तसेच या प्रकरणात सहभागी असलेल्या सर्व दोषी संबंधितांवर फौजदारी गुन्हे दाखल करून कठोर कारवाई करण्यात यावी, अशी मागणीही त्यांनी प्रशासनाकडे केली आहे. दरम्यान, प्रशासनान या गंभीर प्रकरणाकडे तातडीन लक्ष देऊन न्याय दिला नाही, तर जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आत्मदहन करण्याचा इशारा देण्यात आला असून या घटनेची सर्वस्वी जबाबदारी जिल्हाधिकारी आयुष प्रसाद व प्रशासनाची राहील, असा इशाराही तक्रारदारांनी दिला आहे

# ज्ञानदानाबरोबर रोजगाराची संधी मिळवून देण्यास मविप्र कटीबद्ध - सरचिटणीस ॲड.नितीन ठाकरे

**दै. आवाज वृत्तसेवा...**

दिपक ढोकळे, पिंपळगाव लेप : प्रतिनिधी - मविप्र विद्यापीठ होणे ही काळाची गरज आहे त्यामुळे ज्ञानदानाबरोबर रोजगाराची संधी मिळवून देण्यास मविप्र कटीबद्ध असल्याचे मविप्र सरचिटणीस ड.नितीन ठाकरे यांनी येवला होरॉयझन अॅकेडमी येथे आयोजित येवला तालुकास्तरीय मविप्र सभासद मेळावा,मुखेड येथे चार वर्गखोल्या, पाटोदा येथे दहा वर्गखोल्यांच्या नुतन इमारत भूमिपूजन सोहळा कार्यक्रम प्रसंगी सांगितले.कार्यक्रमाचे प्रास्ताविक मविप्रचे माजी संचालक अंबादास बनकर यांनी केले. मविप्र संचालक नंदकुमार बनकर यांनी होरॉयझन अकेॅडमीसाठी इमारतीस वाढीव वर्गखोल्या ची मागणी केली.यावेळी मविप्र सरचिटणीस अॅड. नितीन ठाकरे,उपाध्यक्ष विश्वास मोरे, सभापती बाळासाहेब क्षीरसागर, उपसभापती देवराम मोगल, चिटणीस दिलीप दळवी,मविप्र संचालक डॉ. सयाजीराव गायकवाड, अॅड.लक्ष्मण लांडगे, प्रविण जाधव, शिवाजी गडाख, अमित बोरसे, नंदकुमार बनकर, विजय पगार, शोभा बोरस्ते, शालन सोनवणे, विश्वासराव आहेर, इंजि.साहेबराव सैद, माधवराव पवार, बाळासाहेब गुंड, अॅड.साहेबराव कदम,मा.कृषी सभापती संजय बनकर, नगरसेवक प्रवीण बनकर, दिलीप खोकले, लक्ष्मण गुंड, दत्तात्रय शिंदे,मारोती घोरपडे, नामदेव भागवत, कैलास जगताप, अहिलाजी सोमवंशी आदी तालुक्यातील मविप्र सभासद उप-स्थित होते. कार्यक्रम यशस्वीतेसाठी प्राचार्या सुनिता हिंगडे यांनी केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षीय भाषणात



ड.नितीन ठाकरे हे बोलत होते.मविप्र विद्यापीठाची स्थापना झाल्यास तेथे शंभर टक्के रोजगाराची हमी रा-हील.असे शिक्षण विद्यार्थ्यांना द्यायचे आहे.सभासदांशी हितगुज साधला पाहिजे, सभासदांच्या काय अडचणी आहे त्या समजून घेतल्या पाहिजे, त्या सोडवण्याकरता प्रयत्न केला पाहिजे यासाठी सभासद मेळाव्याचे आयोजन स्पष्ट करत तीन ते साडेतीन वर्षाच्या कालावधीत दहा कोटींचे कामे येवला तालुक्यात झालेले आहे. ज्या ठिकाणी समाजाची मागणी असेल विद्यार्थी संख्या असेल आम्ही त्या ठिकाणी योग्य असा निर्णय घेण्याचा प्रयत्न करत असतो. नाशिकला होमिओपॅथिचे कॉलेज सुरू करायचे आहे. मविप्रतर्फे केवळ शिक्षण नव्हे तर पुढे रोजगार कसा मिळेल यासाठी प्रयत्न आहे.प्रत्येक तालुक्याच्या ठिकाणी रोजगार मेळावे घेत आहोत.येवल्यातही लवकर अशा मेळाव्याचे आयोजन करणार आहोत.या अगोदर ज्ञानदान-ाचे काम करत.आता ज्ञानदानाबरोबर नोकरीची हमी सुद्धा देत आहोत.

मविप्र विद्यापीठ होणे काळाची गरज आहे. प्रस्तावित विद्यापीठास नवीन कोर्स सुरू करायचे आहे तेथे शंभर टक्के रोजग-ाराची हमी असेल. नोकरीची हमी अस-लेले शिक्षण मुलांना द्यायचे की नाही हे सभासदांनी ठरवायचे आहे. मराठा विद्या प्रसारक संस्था हीच आमची आई आहे तिची प्रगती करणे हे आमचे काम आहे. असेही श्री.ठाकरे यांनी आवर्जून सांगितले. सूत्रसंचालन आर.सी.महाले, बाळास-ाहेब सोमासे,कावेरी गायकवाड, कल्पना शेलार यांनी केले.बनकर परिवाराकडून मविप्र सभासदांना स्वादिष्ट जेवण दिले. मविप्र सभासदांची मागणी- निमगाव मढ येथे शाळेसाठी स्वतंत्र इमारत बांधून मिळावी, भाग शाळा जळगाव नेऊर शाळेला स्वतंत्र दर्जा मिळावा.अशी मागणी करण्यात आली.भाग शाळेचा विषय मुख्यमंत्री महोदय यांना भेटून कळवणार आहोत. शाळा स्वतंत्र कशी करता येईल या करता नक्कीच प्रयत्न करणार असल्याचे श्री.ठाकरे यांनी सांगितले. दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार व राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीचे जिल्हाध्यक्ष रवींद्र पगार यांना श्रद्धांजली अर्पण करून कार्यक्रमास सुरुवात.येवला तालुक्यातील जळगाव नेऊर,मुखेड,धुळगाव,गवंडगाव व इतर गावांतील मविप्र सभासदांनी हात उंचावून मविप्र विद्यापीठ व्हावे ही एकमुखी मागणी केली .

# जगदंबा शिक्षण संस्थेतर्फे महिला दिनानिमित्त २०० हून अधिक आशा सेविकांचा सन्मान

**दै. आवाज वृत्तसेवा....**

लक्ष्मण घुगे राजापूर प्रतिनिधी : आशा सेविका या समाजाच्या खऱ्या अर्थाने आरोग्यदूत असून ग्रामीण आरोग्य व्यवस्था सक्षम करण्यात त्यांचे योगदान अत्यंत महत्त्वपूर्ण आहे.या केवळ आरोग्य कर्मचारी नसून त्या आपल्या समाजाच्या खऱ्या अर्थाने आरोग्यदूत आहेत. घराघरात जाऊन आरोग्याची जाणीव करून देतांना ग्रामीण भागात आरोग्यसेवा पोहोचविण्याचे जे मोठे काम आज होत आहे, त्यामागे आशा सेविकांची निःस्वार्थ सेवा आणि अथक परिश्रम आहेत. समाजाच्या आरोग्यरक्षणासाठी निस्वार्थ भावनेने काम करणाऱ्या सर्व आशा सेविकांना मनापासून सलाम आणि कृतज्ञता व्यक्त केली पाहिजे असे प्रतिपादन जगदंबा शिक्षण संस्थेचे संचालक कुणाल दराडे तसेच नगरसेवक रुपेश दराडे यांनी केले.



जगदंबा एज्युकेशन सोसायटी संचलित बाभूळगाव येथील एस.एन.डी. नर्सिंग महाविद्यालयात जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून आज (ता.१० ) विशेष सन्मान सोहळ्याचे आयोजन करण्यात आले.यावेळी मनोगत व्यक्त करतांना श्री.दराडे यांनी भूमिका मांडली.महिला दिनाच्या निमित्ताने ग्रामीण भागातील आरोग्य सेवेचा कणा मानल्या जाणाऱ्या २०० हून अधिक आशा सेविकांचा यथोचित गौरव करण्यात आला. या सन्मान सोहळ्यात आशा सेविकांना भेटवस्तू देऊन त्यांचा सन्मान करण्यात आला.ग्रामीण भागातील आरोग्य सेवेत त्यांनी दिलेल्या मोलाच्या योगदानाबद्दल त्यांचे कौतुक करण्यात आले. कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलन-ाने करण्यात आली.युवा नेते कुणाल दराडे,संचालक रुपेश दराडे यांची विशेष उपस्थिती होती. प्रमुख अतिथी म्हणून उपजिल्हा रुग्णालयाच्या मेट्रन पौर्णिमा चंद्रात्रेय उपस्थित होत्या.

नर्सिंगच्या प्रमुख धनश्री सोहनी, श्रीमती शेख तसेच गट प्रवर्तक हिराबाई साजन, मनीषा राजगुरु, निशिगंधा पागरे, सुरेखा गायकवाड, स्वाती चव्हाण, वर्षा सुतापे, सरिता मादातार आणि सुनंदा परदेशी,नर्सिंग महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. भारती वेलजाळे यांची व्यासपीठावर उपस्थिती होती.

जगदंबा एज्युकेशन सोसायटीने नेहमीच शैक्षणिक कार्यासोबत सामाजिक बांधिलकी जपत विविध उपक्रम राबवले आहेत. महिला दिनाच्या निमित्ताने समाजासाठी अहोरात्र कार्य करणाऱ्या आशा सेविकांचा सन्मान संस्थेने केला असून त्यांच्या कार्याला प्रेरणा देण्याचा आमचा प्रयत्न असल्याचे यावेळी संचालक रुपेश दराडे म्हणाले.आजचा हा सन्मान केवळ रात्रंदिवस सेवा देणाऱ्या प्रत्येक आरोग्य कर्मचाऱ्याचा आहे. जगदंबा एज्युकेशन सोसायटीने दिलेली प्रेरणा प्रत्येक आशाना अधिक जोमाने काम करण्याची ऊर्जा देईल असे प्राचार्या डॉ. भारती वेलजाळे यांनी मनोगत व्यक्त करतांना सांगितले. सूत्रसंचालन कु. सुप्रिया मसके यांनी केले. तालुक्याच्या विविध भागातून दोनशेहून अधिक आशा यावेळी उपस्थित होत्या.

# पीटीसीसमोरील भूखंड फाईल प्रांत कार्यालयात सापडली

नाशिक-: नाशिक त्र्यंबकेश्वर रोड वरील पोलिस अकादमी पीटीसीसमोरील ६२ एकर जमिनीच्या संदर्भातील कथित फाईल गहाळप्रकरणी तक्रार करण्यात आल्यानंतर तब्बल २१ वर्षांनंतर ही फाईल प्रांत कार्यालयात सापडली. प्रांत कार्यालयाच्या वरच्या मजल्यावरील कागदपत्रांच्या गोदामात ही फाईल सापडल्याचे संबंधित कर्मचाऱ्यांनी सांगितले. मंत्रालयात फाईल ही २००५ मध्ये देण्यात आली होती प्रशासनाकडून देण्यात आलेल्या माहितीनुसार, नाशिक येथील सर्वे क्रमांक ७५०, ७५१ व ७५५ या जमिनीसंदर्भातील संचिका सन २००३ मध्ये तहसील कार्यालयातून गहाळ झाल्याचे निदर्शनास आले होते.यासंदर्भात माहिती अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत संबंधित कागदपत्रांची प्रत मागवण्यात आली होती. मात्र त्याची कागदपत्रे सापडत नसल्याने या प्रकरणात राज्य माहिती आयोगाच्या नाशिक खंडपीठाने २२ ऑगस्ट २०२५ रोजी आदेश देत संबंधित जबाबदार अधिकाऱ्यांविरुद्ध विभागीय चौकशी सुरू करण्याचे निर्देश दिले. तसेच सार्वजनिक अभिलेख अधिनियम, १९९३ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यास सांगितले होते. त्या आदेशानुसार नाशिकच्या सरकारवाडा पोलीस ठाण्यात अज्ञात व्यक्तीविरुद्ध गुन्हा नोंद करण्यात आला होता.तीन वर्षांतील निकाल या फाईलमध्ये तक्रारदारांनी केलेल्या तक्रारीनुसार एप्रिल २००३ ते जानेवारी २००५ दरम्यान झालेल्या सुनावणींची कागदपत्रे आहेत.

# डंपरची स्कूटीला धडक, चिमुकल्याचा मृत्यू

( पान १ वरून) ज्योती यशवंते या रस्त्याच्या कडेला असलेल्या वाळूच्या ढिगावर पडल्या, तर अर्नव रस्त्यावर पडला. त्याचवेळी डंपरचे पुढील डावे चाक अर्नवच्या पोटावरून गेल्याने त्याला गंभीर दुखापत होऊन तो जागीच मयत झाला. अपघातात ज्योती यांना हात-पाय व तोंडाला किरकोळ दुखापत झाली असून स्कुटीचेही नुकसान झाले. घटनास्थळी उपस्थित असलेल्या नागरिकांनी जखमींना तातडीने खासगी रुग्णवाहिकेतून लासलगाव ग्रामीण रुग्णालयात दाखल केले. मात्र डॉक्टरांनी तपासणीअंती अर्नवला मृत घोषित केले. दरम्यान, प्रत्यक्षदर्शी शाम साहेबराव साळवे (रा.संधान नगर, टाकळी विंचूर) यांनी अपघात पाहिल्याचे सांगितले. स्थानिक नागरिकांनी डंपर चालकाला थांबवून पोलिसांना माहिती दिली. पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत चालक सोमनाथ राजाराम कोल्हे (वय ३१, रा. सावरगाव, ता. येवला) यास ताब्यात घेतले असून डंपर जप्त केला आहे.याप्रकरणी लासलगाव पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू असून पुढील तपास पोलीस करीत आहेत.

हे पत्रक मालक, मुद्रक, संपादक, प्रकाशक, भगवान नामदेव सोनवणे यांनी शार्प ऑफसेट, मालेगांव बस स्टँड समोर, मालेगांव येथे छापून ढासे मळा, सावता नगर, नांदगांव ता.नांदगांव, जि.नाशिक येथे प्रकाशित केले. सहसंपादक भाऊसाहेब हुजबंद. या अंकात प्रसिध्द झालेल्या बातम्या, लेख, जाहिराती यामधून व्यक्त झालेल्या मतांशी मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक, सहसंपादक सहमत असतीलच असे नाही. मुद्रण दोष संभवनीय. (नांदगांव न्यायकक्षेत) सर्व अधिकार सुरक्षित. मो. ९५४५९१०१७७ - ९२७२४५३९२१ email : nandgaonawaz@gmail.com

# अजिंक्य योद्धा, धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांना विद्यालयात अभिवादन

दै. आवाज वृत्तसेवा...

नांदगाव :- मविप्र समाज संस्थेच्या न्यू इंग्लिश स्कूल नांदगाव मध्ये स्वराज्यरक्षक छत्रपती संभाजी महाराज यांचा पुण्यतिथी साजरी करण्यात आला. यावेळी विद्यालयाच्या वतीने महाराजांच्या महान कार्याला आणि बलिदानाला विनम्र अभिवादन करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यालयाचे मुख्याध्यापिका ज्योती काळे होत्या. प्रारंभी छत्रपती संभाजी महाराजांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.

प्रमुख वक्ते म्हणून बोलताना उपमुख्याध्यापक दिपक चव्हाण यांनी संभाजी महाराजांच्या देदिप्यमान पराक्रमाचा इतिहास मांडला. ते म्हणाले की, छत्रपती संभाजी महाराज हे केवळ एक योद्धे नव्हते, तर ते अष्टपैलू पंडित आणि स्वराज्याचे खंबीर रक्षक होते.




त्यांनी आपल्या आयुष्याच्या शेवटच्या श्वासापर्यंत स्वराज्याची अस्मिता जपली आणि धर्मासाठी दिलेले त्यांचे बलिदान प्रत्येक पिढीसाठी प्रेरणादायी आहे.

आपल्या अध्यक्षीय मनोगत मुख्याध्यापिका ज्योती काळे यांनी ज्यांच्या शौर्यापुढे मृत्यूही नतमस्तक झाला, अशा धर्मवीर स्वराज्यरक्षक छत्रपती संभाजी महाराजांना मानाचा मुजरा! या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री. ज्ञानेश्वर पगार यांनी केले. त्यांनी संभाजी महाराजांच्या जीवनातील महत्त्वाचे प्रसंग उलगडून दाखवले. याप्रसंगी विद्यालयातील सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

विद्यार्थ्यांनी दिलेला 'जय भवानी, जय शिवाजी' आणि 'छत्रपती संभाजी महाराज की जय' या घोषणांनी शाळा परिसर दुमदुमून गेला होता.

**

# मनमाड येथे कारखान्यातील कामगार महिलांचा सत्कार

दै. आवाज वृत्तसेवा...

नॅशनल रेल्वे मजदुर युनियन कारखाना शाखा मनमाड तर्फे जागतिक महिला दिनी तसेच सावित्री फुले यांच्या स्मृती दिनाचे औचित्य साधून कारखान्यातील कामगार महिलांचा सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमात विशेष अतिथी म्हणून मनमाड येथील सुप्रसिद्ध मातोश्री हॉस्पिटलच्या डॉक्टर स्वाती देवरे मॅडम उपस्थित होत्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन शाखेच्या महिला अध्यक्षा योगिता कांगणे यांनी केले , अनुबोधन निता महाले यांनी केले. याप्रसंगी डॉक्टर स्वाती देवरे यांनी महिला कर्मचाऱ्यांना.फार मोलाची मार्गदर्शन केले. तसेच सहायक कारखाना प्रबंधक राम नारायण राम, शाखेचे सचिव कॉम्रेड रमेश केदारे आदींचे मार्गदर्शन पर भाषणं झाली. कार्यक्रमाचे आयोजन ,कॉमेड मनोज गाजरे,रवि चौधरी, साईनाथ लांडगे, योगेश गडवे, बाळासाहेब पवार यांनी केले, महिला कर्मचाऱ्यांना डॉक्टर स्वाती देवरे तसेच सहायक कारखाना प्रबंधक यांच्या हस्ते नॅशनल रेल्वे मजदुर युनियन तर्फे भेट वस्तू देण्यात आली. या कार्यक्रमास सिनियर सेक्शन इंजिनिअर धनंजय घोडके, चीफ ओ एस चंद्रमणी बाबुजी, अशफाक खान, गौतम गांगुर्डे, चंदन कुमार, शेख राहिल आदि कार्यकर्ते उपस्थित होते तसेच महिला कर्मचाऱ्यांची उपस्थिती लक्षणीय होती. कार्यक्रमाच्या शेवटी,आभार प्रदर्शन कॉम्रेड संतोष सोनवणे यांनी केले.




# इचलकरंजीच्या ज्योती नगारे-पाटील यांना 'कर्तृत्ववान महिला पुरस्कार' प्रदान

दै. आवाज वृत्तसेवा...

जे.के.गोरंबेकर - येथील अनंतशांती संस्थेच्या संचालिका ज्योती सचिन नगारे-पाटील यांना स्वराज्य फाउंडेशन महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने दिला जाणारा मानाचा 'कर्तृत्ववान महिला पुरस्कार' देऊन गौरवण्यात आले. इचलकरंजी शहर आणि परिसरात त्यांनी केलेल्या उल्लेखनीय सामाजिक कार्याची दखल घेऊन हा सन्मान करण्यात आला. ज्योती नगारे-पाटील यांनी अनंतशांती संस्थेच्या माध्यमातून आरोग्य, महिला सक्षमीकरण आणि अनाथ मुलांच्या प्रश्नांवर मोठे कार्य उभे केले आहे. त्यांच्या या कार्यामुळे अनेक गरजू कुटुंबांना आधार मिळाला आहे. आरोग्य सेवा: झोपडपट्टी व ग्रामीण भागातील ५,००० हून अधिक गरजूंना केवळ ६० रुपयांत चष्म्यांचे वाटप केले. महिला सक्षमीकरण: बचत गटांचे संघटन आणि मोफत शिवण क्लासच्या माध्यमातून शेकडो महिलांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून दिल्या.




अनाथ मुलांचा आधार: 'मुख्यमंत्री बाल आशीर्वाद योजने'अंतर्गत अनाथ मुलांना दरमहा ४,००० रुपये पेन्शन मिळवून देण्यासाठी यशस्वी पाठपुरावा केला. एआरटी (ART) रुग्णांना घरपोच औषधोपचार पोहोचवणे आणि व्यसनमुक्तीसाठी विशेष प्रयत्न त्यांनी केले आहेत. गरजूंच्या जीवनात बदल घडवणे आणि महिलांना स्वावलंबी करणे हाच आमचा मुख्य उद्देश असून समाजातील शेवटच्या घटकापर्यंत पोहोचण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत, अशी भावना पुरस्कार स्वीकारल्यानंतर ज्योती नगारे-पाटील यांनी व्यक्त केली. मान्यवरांची उपस्थिती या सोहळ्यास स्वराज्य फाउंडेशनच्या अध्यक्षा शिवकन्या पै. अंजली जाधव, हिंदू एकता आंदोलन कोल्हापूरचे जिल्हाध्यक्ष दीपक देसाई, विलास मोहिते, अजित पाटील, काकासाहेब पाटील, भगवान गुरव आणि डॉ. विजय बिरादार-पाटील यांसह इतर मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती अध्यक्षपदी यश साळवे

दै. आवाज वृत्तसेवा...



सिन्नर फाटा:- भिमयोध्दा मित्र मंडळ येथे भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ वी जयंतीच्या अध्यक्षपदी यश साळवे यांची एकमताने निवड करण्यात आली कार्याध्यक्षपदी साई आहिरे, उपाध्यक्षपदी पुजा गोतिश यांचीही निवड करण्यात आली. यावेळी मंडळाचे सदस्य सनी जानराव, रोहित साळवे, रवि पाटील, गौतम बागुल, यश पवार, कमलेश जानराव, गोरख अस्वले, अनिकेत निकम, सचिन खडताळे, स्वप्निल जाधव, करण खडताळे आदि उपस्थित होते.

# पोलिस पाटील सुभाष वाल्हेकर यांचे निधन

दै. आवाज वृत्तसेवा...

नेवासा:- पोलिस पाटील सुभाष भाऊराव वाल्हेकर (वय-७४..) यांचे



बुधवार दिनांक ११ मार्च २०२६ रोजी वृध्दापकाळाने निधन झाले आहे. त्यांच्यावर देवगाव येथील स्मशानभूमीत अंत्यविधी करण्यात आला. त्यांच्या पश्चात दोन मुले व एक मुलगी आहे त्यांच्या पवित्र स्मृतीस विनम्र अभिवादन! शोकाकुल:- अशोक वाल्हेकर, तानाजी वाल्हेकर, काकासाहेब वाल्हेकर, नागेश वाल्हेकर, पत्रकार लखन वाल्हेकर

# मल्हार हिल कॅम्पसवर मातांचा गौरव

दै. आवाज वृत्तसेवा...

तुषार रौंदळ, सटाणा प्रतिनिधी :- भाक्षी येथील आई आशापुरी सामाजिक व शैक्षणिक संस्था संचलित मल्हार हिल कॅम्पसच्या प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात महिला दिनाचे औचित्याने दिवंगत शकुंतला कोठावदे यांच्या स्मृतिदिनी विद्यार्थ्यांच्या प्रगतीत शाळेला सहकार्य करणाऱ्या तसेच विद्यार्थ्यांवर संस्कार रुजवणाऱ्या मातांना आदर्श माता व गुणवंत विद्यार्थ्यांना आदर्श विद्यार्थी पुरस्कारांचे वितरण करण्यात आले.अध्यक्षस्थानी गिरणा गौरव प्रतिष्ठानचे अध्यक्ष सुरेश पवार, डॉ. प्रकाश जगताप, डॉ. अंजली जगताप, भालचंद्र बागड, नगराध्यक्ष हर्षदा पाटील, संस्थेचे अध्यक्ष भालचंद्र कोठावदे, शाळा विकास अधिकारी निर्मला येवला, संचालिका संगीता कोठावदे, संदीप कोठावदे, अरुण ततार, किरण सोनवणे, नंदकिशोर शेवाळे, आदी प्रमुख पाहुणे उपस्थित होते.

उपस्थितांच्या हस्ते २६ आदर्श



मातांसह विद्यार्थ्यांना आदर्श विद्यार्थी पुरस्काराने गौरविण्यात आले. मुख्याध्यापक पंकज दात्रे यांनी प्रास्ताविकात शाळेच्या उपक्रमांची माहिती दिली. विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या गुरुवंदना, मातृ वंदना, महिला सन्मान गीत, आधी सांस्कृतिक कार्यक्रमांनी उपस्थितांची दाद मिळवली.

कार्यक्रमास सारिका शिंदे,अमोल गातवे, शेखर अहिरे, गोकुळ दात्रे, स्वाती दात्रे, कल्याणी गायकवाड, नेहा अहिरे, ज्ञानेश्वर सोळंके, पवन नाडेकर, सिंधू पवार, रेखाबाई अहिरे, सविता आहेर, सविता चव्हाण, पुनम जाधव, वृषाली विसपुते, वैभव नेरकर, मनीषा सोनवणे, चित्रा वाघ, नम्रता बधान, पुनम अहिरे, सोनाली नाडेकर, गायत्री देवरे, मिनाक्षी शिंदे, निलम शेवाळे, मानसी शिवदे, वैष्णवी दुबे, स्वाती सोळंके, निकिता काकुस्ते, ऋतुजा रौंदळ, पूजा सोनवणे, गीतांजली वाघ, हर्षदा पगार, पळवी पगार, शैला गोसावी, धनश्री ठोके, मेनका कोल्हे, पुनम कोल्हे, स्वप्नाली जगताप, रोहित सोनवणे, पुनम देवरे, संजना पगार, विशाल बच्छाव, पराग भामरे, दक्षा निकम, शारदा शेवाळे, निर्मला रौंदळ, रोहिणी सोनवणे, किरण मोरे, रोहित पवार, मनीषा गुंजाळ, उषा रौंदळ, उज्वला कुमावत आदींसह पालक व विद्यार्थी बहुसंख्येने उपस्थित होते.

या मातांचाआदर्श पुरस्काराने गौरव - भाग्यश्री सूर्यवंशी, माधुरी बच्छाव, नीलिमा बिरारी, दिपाली नेरकर, वृषाली मांडवडे, सारिका अहिरे, मीना पवार, सुचिता रौंदळ, स्वाती सोनवणे, हर्षाली सोनवणे, आरती मोरे, शुभांगी सूर्यवंशी, अर्पिता नेरकर, मनीषा गहिवड, सविता बोरसे, रेखा धोंडगे, अश्विनी रौंदळ, रत्ना दात्रे, चित्रा चव्हाण, वर्षा पवार, हेमलता बच्छाव, रीना जगताप, दिपाली सोळंके, सुरेखा ठोके, शितल मोरकर, कल्पना पवार यांचा गौरव करण्यात आला.

# नाशिक च्या पंचवटी परीसरात रंगपंचमी च्या दिवशी महिले सोबत छेडछाड, गुन्हा दाखल होताच गुन्हा शाखा युनिट १ च्या ताब्यात

दै. आवाज वृत्तसेवा...

नाशिक-: रंगपंचमी दिवशी म्हणजे दि. ८ मार्च २०२६ रोजी गर्दीचा फायदा घेवून एका महिलेची काही टवाळखोरांनी छेड काढली होती. यावरून महिलेने दिलेल्या पंचवटी पोलिसात दिलेल्या तक्रारीनुसार शहरातील पंचवटी पोलीस ठाण्यात ४ अनोळखी इसमांविरूध्द गुन्हा १३५/२०२६ भारतीय न्याय संहिता. कलम ७४,११५ (२) ३५२,३५१,(२)३ (५) या प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला होता. गुन्हा संवेदनशील असल्याने नाशिक शहर पोलीस आयुक्त संदिप कर्णिक साहेब यांनी आरोपींचा शोध घेऊन कारवाई करण्याचे आदेश दिले होते. नाशिक शहर पोलीस बीट क्रमांक १, गुन्हे शाखा त्यानुसारगुन्हादाखलहोताचत्याचातपासकरतअसतांना शहर गुन्हे शाखा युनिट१ च्या पोलिस हवालदार श्री महेश साळुंके व पोलिस अंमलदार श्री मुक्तार शेख यांनी दोन तासाच्या आत आरोपींची नावे निष्पन्न करून खबऱ्यांकडून माहिती मिळवली आरोपी हे तपोवन, आडगाव परिसरात येणार आहे, ही माहिती शहर गुन्हे शाखा युनिट१ चे वरीष्ठ पोलिस निरीक्षक डॉ. अंचल मुदगल यांना दिली असता त्यांनी बातमीची खात्री करून कायदेशीर कारवाई करण्याचे आदेश दिले. त्यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस उपनिरीक्षक श्री किरण शिरसाठ, सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक श्री कैलास चव्हाण, पोलिस हवालदार श्री. महेश साळुंके, प्रदीप म्हसदे, प्रविण वाघमारे, विशाल काठे, विशाल देवरे, नाझीम पठाण, पोलिस अंमलदार श्री गोरख साबळे, मुक्तार शेख, आप्पा पानवळ यांचे पथक तयार करून त्यांना तपोवन परिसरात आरोपींचा शोध घेण्यास पाठवले. त्यावेळी पोलीस पथक शोध घेत असताना, तपोवन पंपींग स्टेशन परीसरात जाणाऱ्या रोडवर सर्व आरोपी दिसताच त्यांना ताब्यात घेण्यात आले. त्याची माहिती घेतली असता सतिश लक्ष्मण वाघमारे वय-२० वर्षे रा-आम्रपाली झोपडपटी, उपनगर, नाशिक रोड , तुषार बाळु साळवे वय-१९ वर्षे, रा- रूक्मणी नगर, हनुमान नगर जवळ, लोखंडे मळा, जेलरोड, नाशिक रोड, ओम कृष्णा भांगरे वय-२१ वर्षे रा- मु.काहांडोळ पाडा, पो. भुवन, ता. पेठ, जि नाशिक, अशी असल्याचे त्यांच्याकडून समजले. रंगपंचमीच्या दिवशी केलेल्या गुन्ह्याची त्यांना विचारणा केली असता त्यांनी गुन्हा केल्याची कबुली दिली. त्यामुळे सर्व आरोपींना पुढील कार्यवाहीसाठी पंचवटी पोलीस ठाण्याच्या ताब्यात देण्यात आले आहे.

सदरची कारवाई पोलीस आयुक्त संदिप कर्णिक नाशिक शहर, पोलीस उप-आयुक्त (गुन्हे) किरणकुमार चव्हाण, सहा.पोलीस आयुक्त (गुन्हे) संदिप मिटके यांचे मार्गदर्शनाखाली नाशिक शहर गुन्हेशाखा युनिट१ कडून करण्यात आली. पथकात पोलिस उपनिरीक्षक सुदाम सांगळे, रोहीदास लिलके, राजेश लोखंडे, जगेश्वर बोरसे यांचा देखील समावेश होता.

***

# कविटखेडा-बिरोळा ग्रुप ग्रामपंचायतीच्या उपसरपंचपदी सौ.मोहिनी रामेश्वर साळुंके यांची निवड

दै. आवाज वृत्तसेवा...

शांताराम मगर प्रतिनिधी लोणी खुर्द - वैजापूर तालुक्यातील कविटखेडा बिरोळा ग्रुप ग्रामपंचायतीच्या उपसरपंच पदाची निवडणुक १० मार्च रोजी पार पडली. या निवडणुकीत सौ.मोहिनी रामेश्वर साळुंके यांची उपसरपंचपदी बिनविरोध बहुमताने निवड करण्यात आली. या निवडणूक प्रक्रियेला ग्रामपंचायतीचे सरपंच चेतन भोपळे यांनी अध्यक्षस्थान भूषविले, तर निवडणूक निरीक्षक म्हणुन मंडळ अधिकारी श्रीमती जाधव मॅडम यांनी कामकाज पाहिले.संपूर्ण निवडणूक प्रक्रिया शांततेत व सुरळीतपणे पार पडली. यावेळी ग्रामपंचायत सदस्य नवनाथ निमसे, पंढरीनाथ शिरसाट,संतोष फरांडे, संतोष वाघ प्रकाश भोपळे, योगेश साळुंके, प्रदीप शिंदे, राहुल शिंदे, ज्ञानेश्वर साळुंके, पंकज साळुंके आदी सदस्यांनी नवनिर्वाचीत उपसरपंच सौ. मोहिनी साळुंके यांचे ग्रामस्थांकडून अभिनंदन करण्यात आले. गावाच्या विकासासाठी त्यांनी प्रभावीपणे काम करावे, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. यावेळी बोलतांना मोहिनी साळुंके म्हणाल्या आम्ही गावातील मूलभूत गरजा ओळखून त्या पूर्ण करण्यासाठी ग्रामपंचायत हा महत्वाचा घटक असल्यामुळे ग्रामविकास साधण्यासाठी ग्रामपंचायत आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी आम्ही सदैव प्रयत्नशील राहु ग्रामविकासाच्या अनेक योजना ह्या पंचायत समिती अंतर्गत ग्रामपंचायतद्वारे



राबवून गावाच्याविकासासाठी, कर्तव्याची जाणीव ठेवून काम करु.विविध योजनेच्या माध्यमातून गावांचा कायापालट होऊ शकतो. तेव्हा या योजनेच्या अंमलबजावणीसाठी पदाधिकारी व संबंधित यंत्रणेच्या अधिकाऱ्यांनी समन्वय ठेवण्याची गरजआहे.आपल्या गावात स्वच्छता, सांडपाणी व्यवस्थापन, रस्ते, शुद्ध पाणी पुरवठा यासाठी गावची ग्रामपंचायत आर्थिकदृष्ट्या सक्षम होणे आवश्यक आहे. आपल्या लोणीगावाच्याविकासासाठी निधीची कमतरता भासणार नाही यादृष्टीने तरतूद करुन गावाचा विकास आराखडा तयार करुन, महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेची अंमलबजावणी ग्रामपंचायतद्वारे प्रभावीपणे राबवून लोकांना रोजगार मिळेल आणि रस्ते, वृक्ष लागवड, शेततळे, नाला सरळीकरण, यासारख्या योजनांव्दारे गावाचा विकास साधला जाईल आह्मा प्रकारे आपण सर्वांनी विचार केला तर गावाचासर्वांगीणव्हायला वेळ लागणार नाही.गरज आहे ती आपल्या समस्या काय आहेत हे जाणून घ्यायची आणि त्या दृष्टीने एक एक पाउल टाकत कविटखेडा गावाला आदर्शगावाच्यापंगतीत नेहून ठेवण्याची . याला आपण सर्वजन जबाबदार आहोत आणि आपले सर्वाचे हे प्राथमिक कर्तव्य आहे. शासकीय योजनांचा फायदा लोकांपर्यंत पोहचविण्यासाठी स्वावलंबी, स्वयंपूर्ण, समृद्ध असे गाव शासनाच्या मदतीने कशाप्रकारे तयार करू शकतो ही विच-ारधारा तयार करणे आवश्यक आहे. आणि हे काम गावतील नागरीकांच्या मदतीने आपण स्वयंसेवक समजुन आपण सर्वांनी चाम करू आशी भावना उप सरपंच मोहिनी साळुंके यांनी बोलतांना व्यक्त केली. साळुंके यांची पत्रकारीता. राजकीय. सामाजिक. शैक्षणिक. आध्यात्मिक सांस्कृतिक श्रेत्रातील मान्यवरांसह सर्वच स्तरातून आभिनंदन करण्यात येत आहे.

# शांततेत दडलेला थरार! 'बोल बोल राणी' १० जुलैला होणार प्रदर्शित

दै. आवाज वृत्तसेवा ...



सिड विंचुरकर निर्मित, दिग्दर्शित 'बोल बोल राणी' या चित्रपटाच्या प्रदर्शनाची तारीख जाहीर झाली असून येत्या १० जुलै रोजी हा चित्रपट प्रदर्शित होणार आहे. सोशल मीडियावर प्रदर्शित झालेल्या काही सेकंदांच्या व्हिडिओमध्ये रहस्य आणि उत्सुकतेचं जबरदस्त मिश्रण पाहायला मिळतं. खुर्चीत बसलेली एक तरुणी, बांधलेले हात, पार्श्वभूमीला घोंगावणारं रहस्यमयी संगीत आणि बंदुकीतून सुटलेली गोळी या सगळ्यामुळे 'नेमकं घडलंय तरी काय?' असा प्रश्न प्रेक्षकांच्या मनात निर्माण होत आहे. या व्हिडिओमुळे चित्रपटाच्या कथेबाबत कोणताही थेट उलगडा होत नसला, तरी त्यात दडलेली अस्वस्थ करणारी शांतता आणि थरारक वातावरण चित्रपट एका वेगळ्याच पातळीवर नेणार असल्याचं स्पष्ट होतं. विशेष म्हणजे पंधरा वर्षांनंतर सुबोध भावे, सई ताम्हणकर आणि चिन्मय मांडलेकर हे तीन दमदार कलाकार एकत्र झळकणार असल्यामुळे या चित्रपटाबद्दलची उत्सुकता आणखी वाढली आहे. त्यांच्यासोबत संभाजी ससाणे-ही महत्त्वाच्या भूमिकेत दिसणार आहे. नेमकी ही मुलगी कोण? तिचे हात का बांधलेले आहेत? गोळी कुणासाठी आहे? आणि या सगळ्यामागे कोणतं सत्य दडलं आहे? या प्रश्नांची उत्तरं शोधण्यासाठी प्रेक्षक आतापासूनच चर्चेत रंगू लागले आहेत. चित्रपटाबद्दल निर्माते, दिग्दर्शक सिड विंचुरकर म्हणतात, ''थ्रिलर म्हणजे फक्त भीती दाखवणं नाही, तर प्रेक्षकांच्या मनात प्रश्न निर्माण करणं आणि शेवटपर्यंत त्यांना अस्वस्थ ठेवणं. 'बोल बोल राणी'चा हा व्हिडिओ या प्रवासाचा पहिला टप्पा आहे. प्रत्येक आवाज, प्रत्येक शांतता आणि प्रत्येक दृश्यामागे एक अर्थ आहे. प्रेक्षकांनी हा थरार अनुभवण्यासाठी सज्ज राहावं. न्यूझिलंड मोशन पिक्चर्स आणि फिफ्टी टू फ्रायडे निर्मित या चित्रपटाचे अपूर्वा मोतीवाले सहाय, सिड विंचुरकर आणि अमित भानुशाली निर्माते आहेत. यश मोदी, शब्बीर सबुवाला, रचना वोरा सहनिर्माते असून तपन विचारे, यश राम शाहानी, आयुष कृप्लानी असोसिएट निर्माते आहेत. ए. व्ही. प्रफुल्लचंद्र यांचे या चित्रपटाला संगीत लाभले आहे. रहस्यमयी कथानक, तगडी स्टारकास्ट आणि वेगळ्या मांडणीमुळे 'बोल बोल राणी' हा चित्रपट सध्या चर्चेचा विषय बनत आहे.

# पत्नीने प्रियक, मेव्हण्याच्या मदतीने पतीचा खून; उगावच्या बेपत्ता युवक प्रकरणाचा उलगडा

दै. आवाज वृत्तसेवा...

लासलगाव, प्रतिनिधी - उगाव (ता. निफाड) येथील बेपत्ता युवक शादाब रज्जाक तांबोळी (वय ३०) याच्या खुनाचा उलगडा स्थानिक गुन्हे शाखेने करत पत्नी, प्रियकर व मेव्हण्यासह सात जणांना अटक केली आहे. दागिन्यांच्या व्यवहाराचा बनाव करून युवकाला मनमाड येथे नेऊन त्याचे हात-पाय बांधून खून करून मृतदेह नदीत फेकून दिल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे. दि. १८ फेब्रुवारी २०२६ रोजी उगाव परिसरातून शादाब रज्जाक तांबोळी हा बेपत्ता झाल्याची तक्रार निफाड पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आली होती. त्यानुसार मनुष्य मिसिंग रजिस्टर क्र. १८/२०२६ प्रमाणे नोंद करण्यात आली होती.

दरम्यान दि. २२ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी चांदवड तालुक्यातील परसुल गावच्या शिवारातील परसुली-चिंचोली नदीच्या पुलाखाली पाण्यात एका इसमाचा मृतदेह आढळून आला. अज्ञात आरोपींनी त्या इसमाचे दोन्ही हात नायलॉनच्या दोरीने बांधून, तोंडाला कपडा बांधून तसेच कमरेला व मांडीला दोरीने डंबेल्स बार बाधून नदीत फेकून दिल्याचे आढळून आले. त्यामुळे चांदवड पोलीस ठाण्यात गुरनं ७५/२०२६ भा.न्या. सं. कलम १०३ (१) प्रमाणे खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपासात मृत व्यक्ती ही निफाड पोलीस ठाण्यातील मिसिंगमधील युवक शादाब तांबोळी असल्याचे स्पष्ट झाले. नाशिक ग्रामीण जिल्हा पोलीस अधीक्षक बाळासाहेब पाटील, अपर पोलीस अधी-क्षक आदित्य मिरखेलकर, अपर पोलीस अधीक्षक (मालेगाव) तेगबीर सिंह संधू यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखा, चांदवड व निफाड पोलीसांनी



तपास सुरू केला. उपविभागीय पोलीस अधिकारी मनमाड विभाग बाजीराव महाजन, उपविभागीय पोलीस अधिकारी निफाड विभाग के. के. पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली फॉरेन्सिक, फिंगरप्रिंट व श्वान पथकाच्या मदतीने घटनास्थळाची पाहणी करण्यात आली.

तपासादरम्यान मयताची पत्नी मुस्कान शादाब तांबोळी हिचे ऋषभ मनोज वर्मा (रा. मनमाड) याच्याशी प्रेमसंबंध असल्याचे समोर आले. दोघांना लग्न करायचे असल्याने त्यांनी मयताचा मेव्हणा शाहरूख शफिक शेख याच्यासह इतर साथीदारांच्या मदतीने कट रचला. सोन्याच्या दागिन्यांच्या व्यवहाराचा बहाणा करून शादाब तांबोळी याला मनमाड-मालेगाव रोडवरील बंद पडलेल्या पोल्ट्री फार्मवर बोलावण्यात आले. तेथे त्याचे हात-पाय नायलॉनच्या दोरीने बांधून व तोंडाला कपडा बांधून त्याचा खून करण्यात आला. त्यानंतर मृतदेहा-ला डंबेल्स बार बांधून चांदवड-निफाड रोडवरील परसुल शिवारातील नदीच्या पुलाखाली पाण्यात फेकून दिल्याची कबुली आरोपींनी दिली आहे.

या प्रकरणात पोलिसांनी ऋषभ मनोज वर्मा (वय २३, रा. चांदवड रोड, मनमाड), शाहरूख शफिक शेख (वय २१, रा. मालेगाव नाका, मनमाड - मयताचा मेव्हणा), युवराज विजय थोरात (वय १९, रा. भीमनगर, मालेगाव), सलीम साबीर शेख (वय २८, रा. आझा-दनगर, मालेगाव), आर्यन सुंदर जिनव-ाल (वय १९, रा. भीमनगर, मालेगाव), शेख एजाज शेख रियाज (वय २९, रा. आंबेडकर नगर, मनमाड) मुस्कान शादाब तांबोळी (वय २४, रा. उगाव, ता. निफाड - मयताची पत्नी) या आरोपींना चांदवड पोलीस ठाण्यातील दाखल खुनाच्या गुन्ह्यात अटक करण्यात आली असून पुढील तपास पोलीस निरीक्षक कैलास वाघ यांच्या पथकाकडून सुरू आहे. ही कारवाई स्थानिक गुन्हे शाखेचे पो-लीस निरीक्षक रविंद्र मगर, चांदवड पो-लीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक कैलास वाघ, निफाड पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक गणेश गुरव यांच्यासह सपोनि नितीन रणदिवे, पोउनि प्रकाश भालेराव, सपोउनि नवनाथ सानप, पोहवा सुधाकर बागुल, प्रशांत पाटील, हेमंत गिलबिले, श्रीकांत गारुंगे, ज्ञानेश्वर सानप, सचिन वराडे, विशाल गोसावी, संदीप राठोड, प्रदीप बहिरम, नितीन गांगुर्डे, प्रविण गांगुर्डे, किशोर बोडके आदींच्या पथकाने केली.

****

# श्री महावीर विद्यालयाच्या विद्यार्थ्यांचे राष्ट्रीय पातळीवरील प्रो-ॲक्टिव्ह अबॅकस स्पर्धेत सुयश

दै. आवाज वृत्तसेवा...

लासलगाव, प्रतिनिधी - पुणे येथील गणेश क्रिडा मंच आयोजित राष्ट्रीय पातळीवरील प्रो ॲक्टिव्ह अबॅकस स्पर्धेत लासलगाव येथील श्री महावीर विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन केले. यात विद्यालयाचे इयत्ता ७ वी तील विद्यार्थी ओम अतुल विसप-ुते याने या स्पर्धेत देशात दुसरा क्रमांक पटकावला व वेदांत संदेश साळुंके याने या स्पर्धेत देशात पंधरावा क्रमांक पटकावला.

यशस्वी विद्यार्थ्यांचे विद्यालयाच्या वतीने प्रभारी मुख्याध्यापक शिवाजी धुमाळ,विभाग प्रमुख स्वप्निल मुसळे , राजेंद्र जैन यांच्या शुभहस्ते गुलाब पुष्प व ट्रॉफी देऊन सत्कार करण्यात आला. याप्रसंगी विद्यार्थ्यांचे पालक अतुल



विसपुते व संदेश साळुंके उपस्थित होते.

या स्पर्धेत यशस्वी झालेल्या विद्यार्थ्यांचे व त्यांच्या पालकांचे संस्थेचे कार्याध्यक्ष जवाहरलाल ब्रम्हेचा, मानद सचिव शांतीलाल जैन, खजिनदार अजय ब्रम्हेचा, संचालक मोहनशेठ बरडिया, महावीर चोपडा, अमित जैन, सुनिल आब्बड व संस्थेचे पालक प्रतिनिधी अक्षय ब्रम्हेचा व प्राचार्या पल्लवी चव्हाणके यांनी तसेच सर्व शिक्षक- शिक्षिका, शिक्षकेतर कर्मचारी यांनी हार्दिक अभिनंदन केले.

